अधिसूचना

गृह विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक : २० ऑक्टोबर, २००६.

मोटार वाहने अधिनियम, १९८८.

क्रमांक एसटीसी ३४०६/प्र.क्र.७१/परि-१. -मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम ६७ ची पोट -कलम (१) व (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन व या बाबतीत शासनास समर्थ करणाऱ्या सर्व शक्तींचा वापर करुन व शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक एसटीसी ३४००/६३१/सीआर-३१/परि-१, दिनाक २० जून, २००० अधिक्रमित करुन शासन उपरोक्त पोट-कलमातील तरतुदींच्या खंड (अ) व (क) च्या अनुषंगाने राज्य परिवहन प्राधिकरणास पुढीलप्रमाणे निदेश देत आहे की, कोणत्याही कायद्यान्वये स्थापन झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नगरपालिका, महानगरपालीका, नगरपरिषदा, कटक मंडळ व त्या लगतचा परिसर, ज्या ठिकाणी नगरपालिका, महानगरपालिका, कटक मंडळ या क्षेत्राबाहेरील दीर्घ पल्ल्याच्या सेवांचा भाग म्हणून नव्हे तर, शहर सेवांची व्याप्ती वाढविण्यासाठी व शहर सेवांचा एक भाग म्हणून नगरपालिका, महानगरपालिका, कटक मंडळ व शहर सेवा भागात अंतर्भूत असणाऱ्या इतर मार्गावर चालविल्या जाणाऱ्या परस्पर व्याप्त मार्गावर व मार्गाच्या काही भागात शहर सेवा म्हणून चालविण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची विनिर्दिष्ट परवानगी घेऊन चालविण्यात येणाऱ्या टप्पा वाहतुकी व्यतिरिक्तच्या इतर मार्गावर जेथे शहर सेवा चालविण्यात येत नाहीत अशा मार्गावर टप्पा वाहतुकीचे दर निश्चित करण्याबाबत निदेश देण्यात येत आहेत :-

१. (अ) राज्य परिवहन उपक्रमाने चालविलेल्या सर्व प्रकारच्या सेवांसाठी आकारावयाचे कमाल प्रवासी भाडे (ज्यात टप्पा वाहनातून रस्त्याने नेल्या जाणाऱ्या प्रवाशांवरील कराच्या रकमेचा अंतर्भाव आहे) आपोआप भाडेवाढ सूत्रात, ज्यास शासन निर्णय क्रमांक एसटीसी १०९९/४५१/सीआर-२१/परि-१, दिनांक १६ एप्रिल, १९९९ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे, विहित केलेल्या अटींप्रमाणे राहील.

(ब) राज्य परिवहन उपक्रमास वर्षातील सर्व हंगामात केव्हाही ३३ टक्के पर्यंत वातानुकूलित बसबाबत, ज्यात व्होल्वो वातानुकूलित बस अंतर्भूत आहे आणि इतर सेवांच्या बाबतीत १५ टक्के पर्यंतच्या कमाल मर्यादेपर्यंत भाडे कमी करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. (अ) शासनाकडून परवानीत असल्याशिवाय राज्य परिवहन उपक्रम कमाल व किमान प्रवासी भाडयाची मर्यादा अधिक्रमित करणार नाही.

(ब) राज्य परिवहन उपक्रमाकडून प्रवासी भाडयात करण्यात येणाऱ्या बदलाची अंमलबजावणी गरजेनुसार ज्या महिन्यात करावयाची असेल त्याच्या प्रथम दिवसापासूनच केली जाईल.

३. आपले माता पिता /पालक यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत प्रवासाची सुविधा देण्याबाबत राज्य परिवहन उपक्रमास परवानीत करण्यात येत आहे.

४. वित्त विभागाच्या शासन अधिसूचना क्र. टीआरडब्ल्यू-१३८२/प्र.क्र./कोशागार/४/ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि. १.४.१९८७ नुसार प्रवाशांने प्रवास केलेल्या मार्गाचे भाडे एक रुपयाच्या पटीत नसेल तर टप्पे निहाय वाहतुक रणाऱ्या उपक्रमास अशी भाडे आकारणी करताना ५० पैसे पेक्षा कमी असल्यास सोडून देण्यात यावेत व ५० पैसे व त्या पेक्षा ज्यास्त असल्यास तो पुढील रुपयाच्या उच्च पटीत आकारण्यास परवानीत करण्यात येत आहे.

५. खंड १ व २ मध्ये दिलेले निदेश असताना सुध्दा राज्य परिवहन उपक्रमाला, ज्याची व्याख्या मोटार वाहने अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कलम २ मधील उपक्रम ४२ मध्ये दिलेली आहे. परवानीत करण्यात येत आहे की -

(अ) जर सवलतीचे दर आकारावयाचे असतील तर त्याला उचीत वाटतील अशा प्रवाशांच्या वर्गाबाबत तसे करण्याची मुभा आहे.

(ब) तीन कि.मी. या उपटप्पा किंवा त्याच्या भागास प्रवासी बसलेल्या ठिकाणापासून ५ टप्प्यापर्यंत (३० कि.मी. पर्यंत) उपटप्प्याची आकारणी करण्यात येत आहे.

६. संदर्भित राज्य परिवहन प्राधिकरणाने बसण्याचे ठिकाण व उतरण्याचे ठिकाण हे ज्या ठिकाणी टप्पा किंवा उपटप्पा म्हणून मंजूर केलेले नाही व प्रवास केलेले अंतर भाडे आकारणी करण्याच्या संदर्भात टप्पा किंवा उपटप्पा हे लगतच्या टप्पा किंवा उपटप्प्याजवळ असेल अशा ठिकाणी हे पुढील टप्पा किंवा उपटप्पा म्हणून मंजूर करण्यात आलेले आहे. परंतु ज्या ठिकाणी प्रवास केलेले अंतर हे टप्पा किंवा उपटप्प्याच्या ०.७ कि.मी. पेक्षा जास्त असेल ते दोन्हीपैकी कोणत्याही एका बाजूला ०.७ कि.मी. पर्यंत वाढविले असे गृहीत धरावे. जर प्रवास केलेले अंतर शेवटच्या टप्प्याच्या किंवा उपटप्प्याच्या ठिकाणी १.३ कि.मी. पर्यंत नसेल ते १.३ कि.मी. पर्यंत वाढविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमेश शिंदे)
शासनाचे उप सचिव.

प्रत,

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई.

यांना विनंती करण्यात येते की, सदरची अधिसूचना अशासकीय राजपत्र भाग-४(अ) मध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या १०० प्रती शासनास तात्काळ पाठवाव्यात.

(रमेश शिंदे)
शासनाचे उप सचिव.

NOTIFICATION

Home Department,
Mantralaya, Mumbai-400 032
Dated the 20th October, 2006

MOTOR VEHICLES ACT, 1988

No. STC 3406/CR-71/TRA-1 .- In exercise of the powers conferred by sub sections (1) and (2) of section 67 of the Motor Vehicles Act, 1988 , (59 of 1988) and of all other powers enabling it in this behalf and in super session of Government Notification. Home Department, No. STC 3400/631/CR-31/TRA-1, dated 20th June 2000, the Government of Maharashtra having regard to the provisions of clauses (a) and (c) of the said sub-section (1), hereby issues the following directions to the State Transport Authority regarding the fixing of fares for stage carriage plying in all areas, other than those falling within the limits of Municipal Corporations, Municipal Councils and Cantonment Boards, constituted or established under any law for the time being in force, including those adjacent areas where services are extended by the specific permission of the Regional Transport Authority concerned as an extension of the city services not forming part of a longer route beyond the limits of such Municipal Corporations, Municipal Councils and Cantonment Boards and extended areas forming part of city services and on the routes which may overlap the routes or portions of routes operated as city services lying within the limits of the Municipal Corporations, Municipal Councils and Cantonment Boards, including the areas to which the city services are extended with the specific permission of the Regional Transport Authorities concerned not being the routes along which such city services are operated, namely :-

1. (a) The maximum fares chargeable (inclusive of the amount of tax on passengers carried by road in stagte carriages) in respect of all services operated by the State Transport Undertaking shall be as per the stipulations prescribed in Automatic Fare Revision formula, approved by Government Resolution No. MTC/1099/451/CR-21/TRA-1, dated 16th April 1999.

   (b) The State Transport Undertaking is permitted to reduce the fares in all seasons i.e. any time during the year upto the extent of 33% in case of Air-conditioned

service including Volvo Air-conditioned bus and upto 15% in case of all remaining services which will be the minimum limit of fares of the respective services.

2. (a) The State Transport Undertaking shall not exceed the upper or lower limit of fares unless approved by the Government.

(b) The changes in the fares shall be implemented by the State Transport Undertaking only on the first day of the month wherever necessary.

3. The State Transport Undertaking is allowed to extent free travel facility to the children upto the age of five years while travelling with their parents /guardians.

4. While computing fares chargeable for all services, on the basis of distance travelled by a passenger a fraction of rupee being less than 50 paise should be ignored and that being 50 paise or more should be rounded off to the next higher rupee in view of Government Notification issued by the Finance Department under No. TRW-1382/PRA.KRA-308/Koshagare/4 dated 1.4.1987.

5. Notwithstanding the directions contained in paragraph 1 and 2 above the State Transport Undertaking as defined in clause (42) of section 2 of the Motor Vehicle Act, 1988. (59 of 1988) shall be allowed to charge,-

(a) concessional rates, if it so chooses to do, in respect of such classes passengers as it may think fit, and

(b) fares on the basis of sub-stage of 3 kilometers or part thereof only for a distance upto 30 kilometers from any place of boarding the stage carriage.

6. Where the place of boarding the stage carriage or the place of alighting from the stage carriage is not a stage point or sub-stage point approved by the State Transport Authority concerned, the distance travelled shall, for the purpose of charging the fares, be calculated from the stage point or sub-stage point immediately preceding the stage point or sub-stage point so approved or, as the case may be, from the stage point or sub-stage point immediately succeeding the point so approved.

Provided that, if the distance traveled is not more than 0.7 kilometers then, such a stage point or sub-stage point shall

stand extended on either side upto 0.7 kilometers and if the distance of the route is beyond the last stage point or sub-stage point not exceeding 1.3 kilometer then, such stage point or sub-stage point shall stand extended upto 1.3 kilometers.

By order and seal of Governor of Maharashtra.

(Ramesh Shinde)
Deputy Secretary to Government

To,

The Manager, Government Central Press, Mumbai. He is requested to publish the above Notification in Maharashtra Government Extraordinary Gazette, Part IV-A immediately and return with 700 copies.

(Ramesh Shinde)
Deputy Secretary to Government

तात्काळ

क्र. एसटीसी ३४०६/सीआर-७१/परि-१,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० ऑक्टोबर, २००६

प्रत, माहितीसाठी मार्गदर्शन व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर अग्रेषित.

१) उपाध्यक्ष व व्यवस्थापकी संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
२) सर्व विभागीय आयुक्त, सह परिवहन आयुक्त व सचिव, राज्य परिहवन प्राधिकरण, मुंबई.
३) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व सचिव, प्रादेशिक परिवहन प्राधिकरण
४) सर्व जिल्हाधिकारी.
५) महाप्रबंधक, उच्च्य न्यायालय, मुंबई, (पत्राने)
६) प्रबंधक, उच्च्य न्यायाल (अपील / मूळ शाख), मुंबई/नागपूर/औरंगाबाद
७) प्रबंधक, मुंबई उच्च्य न्यायालय, खंडपीठ नागपूर/ औरंगाबाद
८) प्रमुख न्यायाधीश, नगर दिवाणी व सत्र न्यायाधीश, मुंबई.
९) प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई/नागपूर
१०) संचालक, न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था, नागपूर
११) मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई.
१२) न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, पुणे / नागपूर.
१३) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
१४) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, १०५ सा.बा.वि. इमारत, उच्च्य न्यायालय, मुंबई
१५) सर्व जिल्हा न्यायालये / सत्र न्यायालये / उच्च्य न्यायालये / लघु न्यायालये.
१६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) सर्व उप आणि सहाय्यक परिवहन अधिकारी.
१८) सेक्रेटरी भूतल परिवहन (सरफेस ट्रान्सपोर्ट), मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
१९) महासंचालक, माहिती व जल संपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२०) विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२१) वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

(रमेश शिंदे)
शासनाचे उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय.

असा. क्र. १००		रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, नोव्हेंबर ११, २००६/कार्तिक २०, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑक्टोबर २००६

अधिसूचना

मोटार वाहने अधिनियम, १९८८.

क्रमांक एसटीसी. ३४०६/प्र.क्र. ७१/परि-१.––मोटार वाहने अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) च्या कलम ६७ ची पोट-कलमे (१) व (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून व या बाबतीत शासनास समर्थ करणाऱ्या सर्व शक्तींचा वापर करून व शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक एसटीसी. ३४००/६३१/सीआर-३१/परि-१, दिनांक २० जून २००० अधिक्रमित करून शासन उपरोक्त पोट-कलमांतील तरतुदींच्या खंड (अ) व (क) च्या अनुषंगाने राज्य परिवहन प्राधिकरणास पुढीलप्रमाणे निदेश देत आहे की, कोणत्याही कायद्यान्वये स्थापन झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नगरपालिका, महानगरपालिका, नगरपरिषदा, कटक मंडळ व त्या लगतच्या परिसर, ज्या ठिकाणी नगरपालिका, महानगरपालिका, कटक मंडळ या क्षेत्राबाहेरील दीर्घ पल्ल्याच्या सेवांचा भाग म्हणून नव्हे, तर, शहर सेवांची व्याप्ती वाढविण्यासाठी व शहर सेवांचा एक भाग म्हणून नगरपालिका, महानगरपालिका, कटक मंडळ व शहर सेवा भागात अंतर्भूत असणाऱ्या इतर मार्गावर चालविल्या जाणाऱ्या परस्पर व्याप्त मार्गावर व मार्गाच्या काही भागात शहर सेवा म्हणून चालविण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची विनिर्दिष्ट परवानगी घेऊन चालविण्यात येणाऱ्या टप्पा वाहतुकी व्यतिरिक्तच्या इतर मार्गावर जेथे शहर सेवा चालविण्यात येत नाहीत अशा मार्गावर टप्पा वाहतुकीचे दर निश्चित करण्याबाबत निदेश देण्यात येत आहेत :––

[**किंमत :** रुपये ७.००]

१. (अ) राज्य परिवहन उपक्रमाने चालविलेल्या सर्व प्रकारच्या सेवांसाठी आकारावयाचे कमाल प्रवासी भाडे (ज्यात टप्पा वाहनातून रस्त्याने नेल्या जाणाऱ्या प्रवाशांवरील कराच्या रकमेचा अंतर्भाव आहे) आपोआप भाडेवाढ सूत्रात, ज्यास शासन निर्णय क्रमांक एसटीसी. १०९९/४५१/सीआर-२१/परि-१, दिनांक १६ एप्रिल १९९९ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे, विहित केलेल्या अटींप्रमाणे राहील.

(ब) राज्य परिवहन उपक्रमास वर्षातील सर्व हंगामात केव्हाही ३३ टक्के पर्यंत वातानुकूलित बसबाबत, ज्यात व्होल्वो वातानुकूलित बस अंतर्भूत आहे आणि इतर सेवांच्या बाबतीत १५ टक्के पर्यंतच्या कमाल मर्यादेपर्यंत भाडे कमी करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. (अ) शासनाकडून परवानीत असल्याशिवाय राज्य परिवहन उपक्रम कमाल व किमान प्रवासी भाड्याची मर्यादा अधिक्रमित करणार नाही.

(ब) राज्य परिवहन उपक्रमाकडून प्रवासी भाड्यात करण्यात येणाऱ्या बदलाची अंमलबजावणी गरजेनुसार ज्या महिन्यात करावयाची असेल त्याच्या प्रथम दिवसापासूनच केली जाईल.

३. आपले माता-पिता/पालक यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत प्रवासाची सुविधा देण्याबाबत राज्य परिवहन उपक्रमास परवानीत करण्यात येत आहे.

४. वित्त विभागाच्या शासन अधिसूचना क्र. टीआरडब्ल्यू. १३८२/प्र.क्र./कोषागार-४, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल १९८७ नुसार प्रवाशाने प्रवास केलेल्या मार्गाचे भाडे एक रुपयाच्या पटीत नसेल तर टप्पे निहाय वाहतूक करणाऱ्या उपक्रमास अशी भाडे आकारणी करताना ५० पैसे पेक्षा कमी असल्यास सोडून देण्यात यावेत व ५० पैसे व त्या पेक्षा जास्त असल्यास तो पुढील रुपयाच्या उच्च पटीत आकारण्यात परवानीत करण्यात येत आहे.

५. खंड १ व २ मध्ये दिलेले निदेश असतानासुद्धा राज्य परिवहन उपक्रमाला, ज्याची व्याख्या मोटार वाहने अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कलम २ मधील उपक्रम ४२ मध्ये दिलेली आहे, परवानीत करण्यात येत आहे की,—

(अ) जर सवलतीचे दर आकारावयाचे असतील तर त्याला उचीत वाटतील अशा प्रवाशांच्या वर्गाबाबत तसे करण्याची मुभा आहे.

(ब) तीन कि.मी. या उपटप्पा किंवा त्याच्या भागास प्रवासी बसलेल्या ठिकाणापासून ५ टप्प्यांपर्यंत (३० कि.मी. पर्यंत) उपटप्प्याची आकारणी करण्यात येत आहे.

६. संदर्भित राज्य परिवहन प्राधिकरणाने बसण्याचे ठिकाण व उतरण्याचे ठिकाण हे ज्या ठिकाणी टप्पा किंवा उपटप्पा म्हणून मंजूर केलेले नाही व प्रवास केलेले अंतर भाडे आकारणी करण्याच्या संदर्भात टप्पा किंवा उपटप्पा हे लगतच्या टप्पा किंवा उपटप्प्याजवळ असेल अशा ठिकाणी हे पुढील टप्पा किंवा उपटप्पा म्हणून मंजूर करण्यात आलेले आहे, परंतु ज्या ठिकाणी प्रवास केलेले अंतर हे टप्पा किंवा उपटप्प्याच्या ०.७ कि.मी. पेक्षा जास्त असेल ते दोन्हीपैकी कोणत्याही एका बाजूला ०.७ कि.मी. पर्यंत वाढविले असे गृहीत धरावे. जर प्रवास केलेले अंतर शेवटच्या टप्प्याच्या किंवा उपटप्प्याच्या ठिकाणी १.३ कि.मी. पर्यंत नसेल ते १.३ कि.मी. पर्यंत वाढविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रमेश शिंदे,
शासनाचे उप सचिव.

HOME DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 20th October 2006

NOTIFICATION

MOTOR VEHICLES ACT, 1988.

No. STC. 3406/CR-71/TRA-1.—In exercise of the powers conferred by sub sections (*1*) and (*2*) of section 67 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) and of all other powers enabling it in this behalf and in super session of Government Notification, Home Department, No. STC. 3400/631/CR-31/TRA-1, dated 20th June 2000, the Government of Maharashtra having ragard to the provisions of clauses (*a*) and (*c*) of the said sub-section (*1*), hereby issues the following directions to the State Transport Authority regarding the fixing of fares for stage carriage playing in all areas, other than those falling within the limits of Municipal Corporations, Municipal Councils and Cantonment Boards, constituted or established under any law for the time being in force, including those adjacent areas where services are extended by the specific permission of the Regional Transport Authority concerned as an extension of the city services not forming part of a longer route beyond the limits of such Municipal Corporations, Municipal Councils and Cantonment Boards and extended areas forming part of city services and on the routes which may overlap the routes or portions of routes operated as city services lying within the limits of the Municipal Corporations, Municipal Councils and Cantonment Boards, including the areas to which the city services are extended with the specific permission of the Regional Transport Authorities concerned not being the routes along which such city services are operated, namely :—

1. (*a*) The maximum fares chargeable (inclusive of the amount of tax on passengers carried by road in stage carriages) in respect of all services operated by the State Transport Undertaking shall be as per the stipulations prescribed in Automatic Fare Revision formula, approved by Government Resolution No. MTC. 1099/451/CR-21/TRA-1, dated 16th April 1999.

(*b*) The State Transport Undertaking is permitted to reduce the fares in all seasons i.e. any time during the year upto the extent of 33% in case of Air-conditioned service including Volvo Air-conditioned bus and upto 15% in case of all remaining services which will be the minimum limit of fares of the respective services.

2. (*a*) The State Transport Undertaking shall not exceed the upper or lower limit of fares unless approved by the Government.

(*b*) The changes in the fares shall be implemented by the State Transport Undertaking only on the first day of the month wherever necessary.

3. The State Transport Undertaking is allowed to extent free travel facility to the children upto the age of five years while travelling with their parents/guardians.

4. while computing fares chargeable for all services, on the basis of distance travelled by a passenger a fraction of rupee being less than 50 paise should be ignored and that being 50 paise or more should be rounded off to the next higher rupee in view of Government Notification issued by the Finance Department under No. TRW. 1382/PRA.KRA-308/Koshagare-4, dated 1st April 1987.

5. Notwithstanding the directions contained in paragraph 1 and 2 above the State Transport Undertaking as defined in clause (42) of section 2 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988) shall be allowed to charge,—

(*a*) concessional rates, if it so chooses to do, in respect of such classes passengers as it may think fit, and

(*b*) fares on the basis of sub-stage of 3 Kilometers or part thereof only for a distance upto 30 Kilometers from any place of boarding the stage carriage.

6. Where the place of boarding the stage carriage or the place of alighting from the stage carriage is not a stage point or sub-stage point approved by the State Transport Authority concerned, the distance travelled shall, for the purpose of charging the fares, be calculated from the stage point or sub-stage point immediately preceding the stage point or sub-stage point so approved or, as the case may be, from the stage point or sub-stage point immediately succeeding the point so approved :

Provided that, if the distance traveled is not more than 0.7 Kilometers then, such a stage point or sub-stage point shall stand extended on either side upto 0.7 Kilometers and if the distance of the route is beyond the last stage point or sub-stage point not exceeding 1.3 Kilometers then, such stage point or sub-stage point shall stand extended upto 1.3 Kilometers.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH SHINDE,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई